सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

स्वागत मूल्य १ रु.

https://epaper.globalmahatej.com/

वर्ष १ ले | अंक : ५१ | शनिवार, दि. १५ नोव्हेंबर २०२५ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : १ रु. | Email - globalmahatej@gmail.com

## दिनविशेष
१५ नोव्हेंबर

- आंतरराष्ट्रीय संघटित गुन्हेगारीच्या सर्व प्रकारच्या प्रतिबंध आणि त्याविरुद्ध लढा देण्यासाठी आंतरराष्ट्रीय दिवस
- महात्मा गांधींच्या हत्येसाठी नथुराम गोडसे व नारायण आपटे यांना फाशी.
- सचिन तेंडुलकरने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधे पदार्पण केले.
- झारखंड हे २८ वे राज्य तयार झाले.
- 'बिरसा मुंडा' झारखंड मधील आदिवासी स्वातंत्र्यसैनिक यांचा जन्म.
- 'व्ही. आर. कृष्णा अय्यर' भारतीय वकील आणि न्यायाधीश यांचा जन्म.
- 'दत्तात्रेय शंकर डावजेकर' संगीतकार यांचा जन्म.
- 'सुहास शिरवळकर' कादंबरीकार आणि रहस्यकथालेखक यांचा जन्म.
- 'सानिया मिर्झा' लॉन टेनिस खेळाडू यांचा जन्म.
- 'आचार्य विनोबा भावे' भूदान चळवळीचे प्रणेते, महात्मा गांधींचे पट्टशिष्य यांचे निधन.
- 'कृष्ण चंद्र पंत' केन्द्रीय मंत्री व नियोजन मंडळाचे उपाध्यक्ष यांचे निधन.

### गर्व से कहो स्वदेशी है हम...! स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!! जय भारत...! जय स्वदेशी...!!

# पेरु खाण्याने मिळते उत्तम आरोग्याचे फळ!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

पेरू म्हणजे साधेसुधे दिसणारे पण शरीरासाठी अफाट गुणांच्या खजिन्याने भरलेले फळ आहे. बाजारात सहज मिळणारे, किफायती आणि सर्वांच्या आवडीचे एवढेच नाही, तर आरोग्याला लाभदायक पोषक घटकांनी युक्त असे पेरू आपल्या दैनंदिन आहारात असायलाच हवे. पेरूमधील सर्वात महत्त्वपूर्ण घटक म्हणजे 'लायकोपीन' आहे. हे नाव थोडेसे वैज्ञानिक वाटत असले तरी त्याचा प्रभाव मात्र आरोग्यावर सुपरहिरोसारखा असतो.

लायकोपीन हा अँटिऑक्सिडंटचा राजा समजला जातो. आपल्या शरीरात रोज घातक मुक्त रॅडिकल्स तयार होतात. ते पेशींना नुकसान करतात. या मुक्त रॅडिकल्समुळे शरीरातील विविध अवयवांवर परिणाम होतो आणि कर्करोगाचा धोका वाढू शकतो. अशा वेळी लायकोपीन एक शक्तिशाली ढाल बनून या रॅडिकल्सशी झुंज देतो. पेरूमध्ये लायकोपीन चांगल्या प्रमाणात असल्यामुळे, नियमित पेरू सेवन केल्यास शरीरातील नुकसानकारक बदलांना आळा बसतो.

प्रोस्टेट कॅन्सरपासून बचाव हा लायकोपीनचा विशेष गुण आहे. पुरुषांसाठी हे अत्यंत महत्त्वाचे फळ म्हणून पेरूची गणना केली जाते. डॉक्टरदेखील प्रोस्टेट कॅन्सरचा धोका टाळण्यासाठी लायकोपीनयुक्त आहार घेण्याचा सल्ला देतात. पेरूमुळे प्रोस्टेट ग्रंथीमध्ये उगम पावणाऱ्या घातक पेशींची वाढ मंदावते. ज्यांच्या कुटुंबात पूर्वी असा आजार झाला असेल, त्यांनी पेरू आपल्या सवयीमध्ये नक्कीच समाविष्ट करावा.



लायकोपीनशिवाय पेरूमध्ये व्हिटॅमिन सी, फायबर, पोटॅशियम, फोलेट अशा पोषक घटकांचा अप्रतिम मेळ असतो. ते पचन सुधारते, रोगप्रतिकारक शक्ती वाढवते. त्वचेला नैसर्गिक चमक देते. हृदयाची काळजीही पेरू अतिशय प्रेमाने घेतो. रक्तदाब नियंत्रित ठेवण्यास मदत करून हृदयविकारांपासून रक्षण करतो. म्हणूनच पेरूचे सेवन म्हणजे शरीराला रोजची हेल्दी अपग्रेड गिफ्ट देणे होय. पेरू खाण्याच्याही अनेक मजेदार पद्धती आहेत. जाडू रसाळ पेरू कापून मीठ- मिरचीसोबत सेवन केल्यास चविष्ट लागतो. सलाडमध्ये मिसळला तर अधिक पौष्टिक, तर पेरूचा रस किंवा स्मूथी तर सर्व वयोगटातील लोकांची आवड आहे. सकाळी रिकाम्या पोटी पेरू खाल्ल्यास ते अधिक चांगले कार्य करते. एक पेरू रोज म्हणजे अनेक आजारांना दूर ठेवण्याचा सोपा मंत्रच आहे.

### स्त्रियांसाठीही उपयुक्त!

स्तनाच्या कर्करोगाचा धोका कमी करण्यासाठी लायकोपीन उत्तम कामगिरी बजावतो. हार्मोन्सच्या असंतुलनामुळे स्तनपेशींमध्ये अनियमित वाढ होण्याचा धोका वाढतो. हेच पुढे कर्करोगाचे कारण ठरू शकते. लायकोपीन या हानिकारक पेशींना नियंत्रणात ठेवतो. त्यामुळे महिलांसाठी पेरू हा केवळ चविष्ट नव्हे तर सुरक्षेचाही विश्वासू मित्र आहे.

# भुरट्या चोरट्यांनी माजवला अमळनेर शहरात धुमाकूळ!

## लुल्ला मार्केटमध्ये पहाटे तीन दुकाने फोडली

**ग्लोबज महातेज वृत्तसेवा**

अमळनेर- शहरातील विविध भागात चोऱ्यांचे प्रमाण वाढले आहे. भुरट्या चोरांनी धुमाकूळ माजवला आहे. लुल्ला मार्केटमध्ये शुक्रवार, दि. १४ नोव्हेंबर रोजी पहाटे तीन दुकाने फोडली. सुमारे नऊ हजार रुपये चोरट्यांनी चोरुन नेले आहेत. पोलिसांनी चोरट्यांचा बंदोबस्त करावा, अशी मागणी व्यापाऱ्यांसह नागरिकांनी केली आहे.

लुल्ला मार्केटमध्ये शुक्रवारी पहाटे चोरट्यांनी तीन दुकानांचे शटर लॉक तोडले. हेरंब प्रोव्हिजन या दुकानातून चोरट्यांनी अंदाजे सुमारे ८०० रुपयांची चिल्लर व बिस्कीटांचे पाकिट चोरुन नेले. संजीवनी मेडिकल स्टोअरमध्ये प्रवेश करून सुमारे ३ हजार रुपयांची चिल्लर, गोशाळा दानपेटीतील दानाची रक्कमही चोरुन नेली. अनुपम इलेक्ट्रॉनिक्स दुकानाच्या गल्ल्यातून ५ हजार रुपये चोरुन नेले. पोलिसांनी घटनास्थळी भेट दिली. रात्री उशिरापर्यंत पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला नव्हता. या घटनेमध्ये व्यापाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण आहे. चोरट्यांचा बंदोबस्त करावा, अशी मागणी व्यापाऱ्यांसह परिसरातील नागरिकांनी केली आहे.



(छायाचित्र : रजनीकांत पाटील)

# चोवीस तास पाणीपुरवठा योजनेमुळे ढेकू रस्त्याच्या कामास होणार विलंब!

## उखडलेली खडी, धुळीच्या लोटांमुळे नागरिकांसह वाहनचालक त्रस्त

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर- पावसाळ्यापूर्वी ढेकू रस्त्यावर खडी टाकून डांबरीकरण करण्यात आले होते. मात्र, त्यानंतर हे काम थांबविण्यात आले होते. शहरात २४ तास पाणीपुरवठा योजना मंजुर झाली आहे. रस्त्यावर खोदकाम होणार असल्याने हा रस्ता रखडला आहे. मात्र, या रस्त्यावरची खडी उखडून वर आली आहे. डांबरही निघाले आहे. याचा नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे.

दुचाकी, चारचाकी स्वारांना रस्त्यावरुन जाताना जीव मुठीत धरुन प्रवास करावा लागतो. वाहनांमुळे रस्त्यावरची खडी उडुन पादचाऱ्यांच्या जोरात लागते. त्यामुळे वाहने सावकाश चालवावी लागतात. हा त्रास दोन महिन्यांपासून वाहनचालकांसह नागरिकांना सहन करावा लागत आहे. अवजड वाहनांमुळे धुळही उडते. प्रदूषणामुळे नागरिकांच्या आरोग्यास धोका आहे. अपूर्ण कामामुळे काही ठिकाणी खोल खड्डे पडले आहेत. काही ठिकाणी उंच, सकल भाग निर्माण झाला आहे. पावसाळ्यात चिखल होतो. वाहतुकीस अडथळे निर्माण होतात. हा रस्ता पुढे अनेक गावांना जोडणारा रस्ता आहे. या रस्त्यावर अनेक मोठ्या कॉलन्या, वसाहती आहेत. यामुळे या रस्त्यावरुन ये- जा करणाऱ्यांची रोजच मोठी वर्दळ असते.

या रस्त्यावर शाळा, अनेक व्यापारी संकुलांचे निर्माण झाले आहे. विशेष म्हणजे याच मार्गावर सार्वजनिक बांधकाम विभागाचे विभागीय कार्यालय, शहराचे मुख्य पोलिस ठाणे आहे. हा रस्ता दुरवस्थेत असल्याने अधिकारीही त्रस्त आहेत. या रस्त्याकडे कोणीही गांभिर्याने लक्ष देण्यास तयार नाही. हा रस्ता पूर्ण व दर्जेदार करावा. अन्यथा आंदोलन छेडले जाईल, असा इशारा नागरिकांनी दिला आहे.



(छायाचित्र : योगेश महाजन)

> "खराब रस्त्यामुळे वाहन चालविताना जीव मुठीत धरुन प्रवास करावा लागतो. विशेषतः वयोवृद्धांचे हाल होत आहेत. या रस्त्यावरुन रोज ये- जा करावी लागते. मात्र, यामुळे मणक्यांचा त्रास उमळला आहे. अवजड वाहनांमुळे उडणारा धुराळा (फपुटा) नाका- तोंडात जाऊन आरोग्यास धोका निर्माण झाला आहे. २४ बाय ७ पाणीपुरवठा योजनेसाठी खोदकाम होणार आहे. मात्र, हे काम कधी होणार याची शाश्वती नाही. तोपर्यंत आम्ही हा त्रास सहनच करावा का ?
> **-विनोद पाटील, नागरिक, ढेकू रोड.**

> "ढेकु रस्त्यावर चोवीस तास पाणीपुरवठा योजनेसाठी खोदकाम होणार आहे. परिणामी या रस्त्यांला विलंबच होणार आहे. हा रस्ता पूर्ण केला तरी तोडफोड करावी लागणार आहे. यामुळे रस्त्याचेही नुकसान होईल. यासाठी रस्त्याचे काम सध्या बंद ठेवण्यात आले आहे.
> **- भागवत माळी, अभियंता, सा. बां. विभाग, अमळनेर.**

# श्री मंगळ ग्रह मंदिरात उद्या मोफत मोतीबिंदू तपासणी शिबिर

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर- मंगळ ग्रह सेवा संस्था, ना. गुलाबरावजी पाटील सोशल फाउंडेशन (पाळधी), संकल्प सेवा फाउंडेशन (धनवाडी) व आर. झुनझुनवाला शंकरा आय हॉस्पिटल, पनवेल (नवी मुंबई) यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत मोतीबिंदू तपासणी व शस्त्रक्रिया शिबिर होणार आहे.

रविवार, दि. १६ नोव्हेंबर रोजी सकाळी नऊ ते दुपारी २ वाजेपर्यंत श्री मंगळ ग्रह मंदिरात हे शिबिर होईल. मोतीबिंदूने त्रस्त व महागडे उपचार यामुळे गरजू रुग्णांना या शिबिराचा लाभ होतो. तपासणी झाल्यानंतर शस्त्रक्रियेस पात्र ठरलेल्या रुग्णांची व्यवस्था संस्थेकडून करण्यात येते. शिबिराचा गरजू रुग्णांनी लाभ घ्यावा, असे आवाहन श्री मंगळ ग्रह सेवा संस्थेकडून करण्यात आले आहे. मंदिरात दर महिन्याच्या तिसऱ्या रविवारी हे शिबिर नियमित होते.

# कुणबी पाटील समाजातर्फे उद्या गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर- जगत्गुरु श्री संत तुकाराम महाराज कुणबी पाटील समाज बहुउद्देशिय मंडळातर्फे समाजातील गुणवंत विद्यार्थी व उल्लेखनिय कार्य करणाऱ्या समाजबांधवांचा गौरव होणार आहे. रविवार, दि. १६ नोव्हेंबर रोजी गलवाडे रस्त्यावरील सिद्धिविनायक नगरात सकाळी दहाला हा गुणगौरव सोहळा होईल.

माजी मंत्री तथा आमदार अनिलदादा पाटील अध्यक्षस्थानी असतील. खासदार स्मिताताई वाघ, माजी आमदार डॉ. बी. एस. पाटील, कृषिभुषण साहेबरावदादा पाटील, डॉ. अनिल शिंदे, धुळे येथील उद्योजक तानाजी पाटील, प्रा. राजेंद्र पाटील (लोणार सरोवर), गोरख पाटील (धुळे), प्रा. सुभाष वाघ (मालेगाव), नीलेश पाटील (जळगाव), वसंतराव पवार, जगन्नाथ पाटील (हिरापूर), राजेंद्र पाटील (भुसावळ), रवींद्र पाटील (कासोदा), योगेश पाटील (पीएसआय, छत्तीसगड) आदी प्रमुख पाहुणे असतील.

कार्यक्रमास समाजबांधवानी उपस्थित राहावे, असे आवाहन कुणबी पाटील समाज मंडळाचे अध्यक्ष शेखर पाटील, उपाध्यक्ष नवल पाटील, सेक्रेटरी अशोक पाटील, खजिनदार पुरुषोत्तम पाटील व कार्यकारी सदस्यांनी केले आहे.

# प्लास्टिक बाटलीतून पाणी पिताय, सावधान!

## हृदयासाठी धोकेदायक असल्याची धक्कादायक माहिती संशोधनातून उघड

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

बरेच जण ऑफिस, वर्कआऊटला जाताना प्लास्टिकच्या बाटलीतून पाणी घेऊन जातात. एवढेच नाही तर शाळा, कॉलेजमध्ये जाणारी मुलेही पाणी पिण्यासाठी विविध स्टाइलच्या प्लास्टिकच्या बाटल्या वापरतात. मात्र, प्लास्टिकच्या बाटलीतून पाणी पिणे हृदयासाठी धोकादायक आहे. हे एका संशोधनातून समोर आले आहे. क्लिंग फिल्ममध्ये गुंडाळलेल्या भाज्या, ऑनलाइन मागवलेले मासेदेखील तुमच्या हृदयासाठी हानिकारक असल्याचेही संशोधनातून उघड झाले आहे.

प्लास्टिकची बाटली किंवा क्लिंग फिल्ममधील मायक्रोप्लास्टिक्स तुमच्या रक्तप्रवाहात तरंगते. ज्यामुळे हृदयविकाराचा झटका आणि स्ट्रोकचा धोका ४. ५ पटीने वाढू शकतो. इटलीच्या कॅम्पानिया विद्यापीठाच्या एका नवीन अभ्यासात आणि न्यू इंग्लंड जर्नल ऑफ मेडिसिनमध्ये प्रकाशित झालेल्या अभ्यासात, व्यक्तींच्या धमन्यांमध्ये मायक्रोप्लास्टिक आढळून आले आहे. पाच मिलिमीटरपेक्षा कमी असेही प्लास्टिकचे तुकडे सापडले आहेत. डॉक्टरांनी ३०४ रुग्णांच्या धमन्यांमध्ये चरबी जमा होण्याचे प्रमाण तपासले. यावेळी ३०४ रुग्णांपैकी ५० टक्क्यांहून अधिक रुग्णांच्या रक्तात मायक्रोप्लास्टिक्स आढळले. हे मायक्रोप्लास्टिक्स व्यक्तीच्या कॅरोटीड धमन्यांमध्ये आणि मुख्य रक्तवाहिन्यांत जमा होते. ज्यातून मान, चेहरा आणि मेंदूला रक्तपुरवठा होतो. इतकेच नाही तर या मायक्रोप्लास्टिक्समुळे तीन वर्षांत ब्लॉकेज आणि हृदयविकाराचा धोका वाढतो. हे निष्कर्ष महत्त्वपूर्ण आहेत.



यातून स्पष्ट झाले आहे, की उच्च रक्तदाब, कोलेस्ट्रॉल, धूम्रपान, लठ्ठपणा आणि मधुमेहाच्या रुग्णांसाठी मायक्रोप्लास्टिक हे अतिरिक्त जोखीमेचे घटक आहेत. सर्वात चिंताजनक बाब म्हणजे आपण खात असलेल्या प्रत्येक गोष्टीमधून नकळतपणे मायक्रोप्लास्टिक आपल्या शरीरात जात आहेत.

**शरीरावर काय परिणाम होतात ?**

एकदा का मायक्रोप्लास्टिक्स तुमच्या धमन्यांमध्ये गेले,

**पान ३ वर**

# पालिका निवडणुकीसाठी ५६ उमेदवारी अर्ज दाखल

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर- पालिका निवडणुकीसाठी शुक्रवार, दि. १४ नोव्हेंबरपर्यंत नगरसेवक पदासाठी ५३, तर नगराध्यक्षपदासाठी ३ उमेदवारी अर्ज दाखल झाले आहेत. उमेदवारांनी अर्ज दाखल करताना शक्तीप्रदर्शन केले.

पालिका निवडणुकीसाठी गुरुवार, दि. १३ नोव्हेंबर अखेर २४ नगरसेवक पदासाठी, तर २ नगराध्यक्षपदासाठी अर्ज दाखल झाले होते. शुक्रवारी यात २९ अर्जांची वाढ झाली आहे. उमेदवारी अर्ज दाखल करताना उमेदवारांच्या समर्थक, कार्यकर्त्यांची मोठी गर्दी केली होती. सोमवार, दि. १७ नोव्हेंबर उमेदवारी अर्ज दाखल करण्याची अंतीम तारीख आहे. यामुळे उमेदवारी अर्जांचा पाऊस पडण्याची शक्यता आहे. अर्जांची सख्या पाहाता अनेक प्रभागांमध्ये चुरशीच्या लढती होण्याची शक्यता वर्तविली जात आहे. ऐन थंडीच्या दिवसात रणधुमाळी चांगलीच तापली आहे. अनेक उमेदवारांनी मतदारांच्या भेटीगाठी सुरू केल्या आहेत.





# कोचिंग नहीं, सेल्फ स्टडी के दम पर बनीं आयएएस, कंप्यूटर साइंस से बी.टेक के बाद यूपीएससी में गाड़ा झंडा

## सक्सेस स्टोरी

आज एक ऐसे आईएएस की कहानी जानेंगे, जिसके पास एक नहीं बल्कि दो -दो बड़ी डिग्री है. हम बात कर रहे हैं आयुषी प्रधान की, जिन्होंने सिर्फ २६ साल की उम्र में यूपीएससी सीएसई परीक्षा में सफलता हासिल कर ली। आयुषी ने वर्ष २०२३ में यूपीएससी सीएसई परीक्षा में ३६ वीं रैंक हासिल करके आयएएस का पद हासिल किया ।

### घर में था पढ़ाई का माहौल

आयएएस आयुषी प्रधान का जन्म ओड़िशा में हुआ है । उनके पिता बैंक में मैनेजर हैं और उनकी मां हाउस वाइफ । आयुषी के घर में हमेशा से पढ़ाई-लिखाई को काफी महत्व दिया जाता है । यही कारण है कि शुरू से ही आयुषी पढ़ाई में काफी ध्यान देती थीं ।

### कंप्यूटर साइंस से किया है बीटेक

आयुषी हमेशा से पढ़ाई में बेहतरीन रहीं. सेंट एनीज कॉन्वेंट स्कूल से १० वीं की परीक्षा में उन्होंने ९३.५% अंक हासिल किया । इसके बाद १२ वीं कक्षा भुवनेश्वर के मदर्स पब्लिक स्कूल से पूरी की, जहां उन्हें ९३% मार्क्स मिले थे । अकैडमिक में अच्छा परफॉर्मेंस देखते हुए उन्होंने इंजीनियरिंग करने का फैसला लिया । आयुषी ने भुवनेश्वर स्थित कॉलेज ऑफ इंजीनियरिंग एंड टेक्नोलॉजी (सीईटी) से कंप्यूटर साइंस में इंजीनियरिंग की डिग्री हासिल की है ।

### एमबीए करते हुए यूपीएससी का आया ख्याल

इंजीनियरिंग करने के बाद बाकी के स्टूडेंट्स (बी.टेक स्टुडंटस्) को देखते हुए उन्होंने भी एमबीए प्रोग्राम में एडमिशन ले लिया । लेकिन इस दौरान उन्हें एहसास हुआ कि उनकी असली मंजिल सिविल सेवा है । ऐसे में उन्होंने अपना फोकस एमबीए से हटाकर यूपीएससी की तरफ शिफ्ट किया ।

### तीसरे प्रयास में पाई सफलता

आयुषी ने अपने पहले प्रयास में सफलता हासिल कर ली और इंटरव्यू तक पहुंच गईं । लेकिन १३ अंकों के मामलू अंतर से चूंक गईं । हालांकि, उन्होंने फिर से तैयारी शुरू की, इस बार ३३४ वीं रैक और भारतीय रक्षा संपदा सेवा मिली । लेकिन आयुषी की आयएएस ही बनना था । ऐसे में उन्होंने एक बार फिर परीक्षा दी और अपने तीसरे प्रयास में सफलता हासिल कर ली ।



### कोचिंग नहीं सेल्फ स्टडी के दम पर की तैयारी

आयुषी ने यूपीएससी परीक्षा के लिए किसी कोचिंग का सहारा नहीं लिया बल्कि सेल्फ स्टडी पर फोकस किया । आयुषी की कहानी उन सभी के लिए प्रेरणा है, जो देर से सिविल सेवा परीक्षा की तैयारी शुरू करते हैं । लेकिन खुद की तैयारी पर भरोसा रखते हैं ।

# प्रेमलाकाकी यांनी रचलाय भारतीय महिला क्रिकेटचा पाया!



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



> ज्यावेळी स्त्रीला समाजात ' चूल आणि मूल ' एवढेच स्थान होते, स्त्रीला समाजात कोणताही दर्जा नव्हता अशा वेळी तिला खेळाच्या माध्यमातून एक नवी दिशा, नवसंजीवनी देण्याचे काम करणाऱ्या प्रेमलाकाकींना महिला क्रिकेट संघाने विश्वचषक जिंकून अनोखी आदरांजली वाहिली.
>
> **- पृथ्वीराज चव्हाण, माजी मुख्यमंत्री.**

भारताच्या महिला क्रिकेट संघाने २ नोव्हेंबरला आयसीसी विश्वचषक उचलला तो क्षण फक्त विश्वविजयाचा क्षण उरलेला नाही. त्या क्षणापासून फक्त भारतातील क्रीडा क्षेत्र बदललेले नाही, तर महिला खेळाडूंकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलला आहे. त्याची सुरूवात सत्तरच्या दशकात झाली. या भारतीय महिला क्रिकेट टीमला माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्या मातोश्री आणि महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसच्या अध्यक्षा प्रेमलाकाकी चव्हाण यांनी जागतिकस्तरावर पहिल्यांदा पोहोचविले. ब्रिटिश काळापासून देशात क्रिकेट हा एक धर्म आहे आणि क्रिकेटपटू देव आहेत. देशात असे एक गाव शोधून सापडणार नाही, जिथे क्रिकेट खेळले जात नाही. केवळ चूल आणि मूल या चौकटीत अडकून न राहता आता महिलांनी ही चौकट मोडून सर्वच क्षेत्रात आघाडी घेत आपली स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली. हा खेळ प्रामुख्याने पुरुष खेळतात, तरी काही उत्साही महिलांनी १९७० च्या दशकाच्या सुरूवातीला क्रिकेट खेळायला सुरूवात केली.

त्यावेळी हा खेळ अधिकृतपणे आयोजित केला जात नव्हता; पण भारतात महिलांचे वेगळे क्रिकेट असोसिएशनच नव्हते. त्यावेळी कऱ्हाड लोकसभा मतदारसंघातून काँग्रेसच्या प्रेमलाकाकी चव्हाण यांच्या निदर्शनास ही बाब आली. प्रेमलाकाकी मूळच्या बडोद्याच्या. त्यांचे वडील मालोजीराजे जगदाळे हे इंदूरच्या होळकरांच्या दरबारातील मानकरी होते. लहानपणापासून त्यांना खेळाची प्रचंड आवड होती. इंदूर संस्थानच्या होळकर महाराजांनी बनविलेली क्रिकेटची टीम देशभरात नाव गाजवत असलेले पाहत त्या मोठ्या झाल्या होत्या. भारतीय महिलांनी देखील क्रिकेटमध्ये नाव कमवावे, असे प्रेमलाकाकींना वाटायचे. ज्या देशाच्या पंतप्रधान एक महिला आहेत त्यातल्या महिलांची क्रिकेट टीम नाही, हे दुर्दैव असल्याचे प्रेमलाकाकींनी प्रधानमंत्री इंदिरा गांधी यांना पटवून दिले. त्यांच्याच पाठिंब्यावर १९७५ मध्ये प्रेमलाकाकी चव्हाण यांनी पुण्यात भारतीय महिला क्रिकेट असोसिएशनची स्थापना केली. असोसिएशनचे सचिव महेंद्र कुमार शर्मा यांच्या मदतीने हळूहळू प्रत्येक राज्यात जाऊन मुलींना क्रिकेट खेळण्यासाठी उद्युक्त केले. जेव्हा या मुली कोणत्याही दौऱ्यासाठी जायच्या तेव्हा प्रेमलाकाकी व त्यांच्या सोबत महिला क्रिकेट असोसिएशनचे सदस्य उपस्थित होते. त्यांच्याच प्रयत्नामुळे १९७६ मध्ये पहिल्यांदा वेस्ट इंडिजची महिला क्रिकेट संघ भारत दौऱ्यावर आली. मद्रासच्या शांता रंगास्वामी यांच्या नेतृत्वाखाली भारतीय महिला संघाने पहिली आंतरराष्ट्रीय कसोटी सामना खेळला. पुढच्या दोनच वर्षांत १९७८ मध्ये पाटणा येथे त्यांनी देशाला पहिला कसोटी विजय मिळवून दिला. ज्या देशातील जुन्या पिढ्या स्त्रियांना डोक्यावरचा पदर हटवू देत नव्हत्या, त्या देशातील महिलांनी क्रिकेटमध्ये अस्तित्व दाखविण्यास सुरूवात केली. भारताच्या महिलांच्या संघामधल्या हरमनप्रीत कौर, स्मृती मनाधना आणि शेफाली वर्मा या खेळाडू सुनील गावसकर, सचिन तेंडुलकर, विराट कोहली यांच्या तोडीस तोड आहेत, यात कोणतीही शंका नाही.

खूप संघर्ष आणि कठोर परिश्रमानंतर २ नोव्हेंबर २०२५ ला भारताने आयसीसी विश्वचषक जिंकून हे देशातील महिला क्रिकेटसाठी हे एक मोठे मनोबल वाढविणारे आहेच. त्याचबरोबर घराचा उंबरठ्यात अडकलेल्या भारतीय नारीच्या स्वातंत्र्याचे प्रतीक म्हणून देखील बनले आहे.

# नॅशनल क्रश गिरीजा ओक-गोडबोले व्हायरल फोटोमुळे जोरदार चर्चेत!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

सध्याची नॅशनल क्रश म्हणून गिरीजा ओक-गोडबोले एका फोटोमुळे चांगलीच चर्चेत आहे. मात्र, या फोटोमध्ये असे काय आहे ? की ज्यामुळे ती इतकी व्हायरल झाली आहे. याबाबत समाज माध्यमावर एका युजरने प्रतिक्रिया दिली आहे.

या युजरने दिलेल्या पोस्टमध्ये लिहिले आहे, की गिरीजा ही नव्याने इंडस्ट्रीत आलीये का? तर नाही. आधी सुंदर दिसत नव्हती का ? तर असेही नाही. मग आजच, इतक्या वर्षाच्या कारकिर्दी नंतर ती नॅशनल क्रश का बरे वाटायला लागली असेल, तर या फोटोत ती अतिशय सिंपल आहे. मात्र, इतकेच पुरेस नाहीये. तिने जेवढ्या पण जाहिराती केल्या. सीरिअल्स केल्या, त्यात ती कायमच सिंपलच राहिली आहे. तिचा लुक हा कायमच सिंपल दाखवला गेलाय. पण या फोटो मध्ये, ती खूप जास्त आत्मविश्वासू वाटते. त्यामुळे तिच्या बसण्याच्या पद्धतीमध्ये सुद्धा तो आत्मविश्वास खूप ठळक दिसून येतो. त्याच बरोबर मन निखळ, निर्मळ असले की शरीराचा पोत सुद्धा तितकाच निखळ आणि निर्मळ दिसतो. माणूस आपल्या आयुष्यात समाधानी असला की ते समाधान त्याच्या चेहऱ्यावर झळकते. चेहरा नॅचरली ग्लो करतो. नो फिल्टर पर्सनॅलिटी म्हणजे काय ? तर आतून आणि बाहेरून माणूस अगदी सारखाच.



म्हणजे खायचे वेगळे आणि दाखवायचे वेगळे असे नाही. पूर्णपणे स्वभावातली पारदर्शकता ही डोळ्यात दिसून येते. म्हणून डोळे छान पाणीदार आणि तेजस्वी दिसायला लागतात. आतून माणूस रिलॅक्स असला की साहजिकच चेहऱ्यावरही ते रिलॅक्सेशन दिसते. इतके प्रभावी असते की बघणारा सुद्धा रिलॅक्स काल्म फिल करतो. शरीरयष्टी म्हणजेच आपली तब्बेत ही सुद्धा तुमच्या सध्याची मेंटल हेल्थ, मानसिक स्थिती कशी आहे हे दाखवतात. त्यामुळेच तिचा बांधा सुद्धा आकर्षक वाटतो. आता सगळ्या गोष्टींना चार चांद लावले ते तिचा सिंपल, सॉफ्ट लाईट कलरच्या कॉटन साडीने. चेहऱ्यावरचा आणि व्यक्तिमत्वात असणाऱ्या साधेपणा या साडीने आणखीनच ठळक केला. तुमच्या मूडवर कपडे खूप मोठा इफेक्ट करतात. अगदी पेहरावाचा कलर, अगदी त्याचे कापड सुध्दा खूप परिणाम करते ते तुम्हाला आतून खुश आणि कंफर्टेबल करण्यासाठी. ओव्हरऑल या गोष्टींमुळे होते काय की , त्या व्यक्तीचे व्यक्तिमत्व साधे जरी वाटत असले तरी ते खूप जास्त अ‍ॅट्रॅक्टिव्ह दिसायला लागते. म्हणूनच गिरिजाचा हा फोटो इतका व्हायरल झाला, अस मला वाटते. गिरीजाने हा पहिला इंटरव्ह्यू दिलेला नाही. त्यांच्या शोचे नावच आहे घरघर की बाते. यात आत्तापर्यंत तीन तरी एपिसोड झालेत. थोडक्यात काय की माणूस आतून फिजिकली, मेंटली हेल्दी असला की दिसायला ही तो तितकाच अ‍ॅट्रॅक्टिव्ह दिसतो.

# कोणत्या गोष्टी फ्रीजमध्ये ठेवाल ?



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

लोकांना असे वाटते, की फ्रीजमध्ये सर्वकाही जास्त काळ ताजे राहते. परंतु काही गोष्टी फ्रीजमध्ये ठेवणे हानिकारक ठरू शकते. यामुळे त्यांचा दर्जा, चव किंवा टिकाऊपणा कमी होऊ शकतो. खाली अशा काही गोष्टी आणि त्यामागील कारणे दिली आहेत.

**टोमॅटो**

फ्रीजमध्ये टोमॅटो ठेवल्यास त्याची चव आणि रस कमी होतो. थंड तापमानामुळे टोमॅटोचा नैसर्गिक स्वाद बदलतो. काहीवेळा पचनासंबंधी त्रास होऊ शकतो. टोमॅटो खोलीच्या तापमानात ठेवावेत.

**कांदा**

फ्रीजमधील ओलाव्यामुळे कांदा मऊ, खड्ड्यासारखा किंवा डाग पडलेला होऊ शकतो. तसेच कांद्याचा तीव्र गंध इतर पदार्थांना लागू शकतो. कांदा कोरड्या आणि हवेशीर जागी साठवावा.

**केळी**

फ्रीजमध्ये केळी ठेवल्यास त्यांची साल काळी पडते आणि चव बदलते. थंड तापमानामुळे केळी लवकर खराब होऊ शकतात. केळी खोलीच्या तापमानात ठेवावीत.

**काकडी**

फ्रीजमधील थंडीमुळे काकडीचा कुरकुरीतपणा कमी होतो आणि ती मऊ पडते. काकडी कोरड्या आणि मध्यम तापमानाच्या जागी साठवावी.

**मसाले**

फ्रीजमधील ओलाव्यामुळे मसाले खराब होऊ शकतात किंवा त्यांचा सुगंध कमी होतो. मसाले हवाबंद डब्यात कोरड्या जागी ठेवावेत.

**तेल**

फ्रीजमध्ये तेल ठेवल्यास ते घट्ट होते आणि त्याचा नैसर्गिक पोत बदलतो. तेल खोलीच्या तापमानात, थेट सूर्यप्रकाशापासून दूर ठेवावे.

**अक्रोड (वॉलनट्स)**

फ्रीजमधील ओलाव्यामुळे अक्रोड लवकर तेल सोडतात. ज्यामुळे त्यांची चव आणि टिकाऊपणा कमी होतो. अक्रोड हवाबंद डब्यात कोरड्या जागी साठवावेत.

**सल्ला**

वरील पदार्थ खोलीच्या तापमानात, कोरड्या आणि हवेशीर जागी ठेवल्यास त्यांचा दर्जा आणि चव टिकून राहते. फ्रीजचा वापर केवळ ताज्या आणि लवकर खराब होणाऱ्या पदार्थांसाठी करावा.

# हातावरील तीळ अन् तिचे हस्तरेषाशास्त्रातील महत्त्व

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

हस्तरेषाशास्त्रानुसार हातावरील तीळ व्यक्तीचा स्वभाव, भविष्य आणि जीवनातील विविध पैलूंना सूचित करतात. प्रत्येक बोटावरील तीळ आणि त्याच्या विशिष्ट भागांनुसार त्यांचे अर्थ खालीलप्रमाणे आहेत.

### अंगठा अंगठ्यावरील तीळ

यशस्वी पालकत्व आणि मजबूत व्यक्तिमत्त्व दर्शवितात.

**पहिला भाग (टोक) :** वडिलांकडून संरक्षण मिळते. अशा व्यक्ती निर्णायक, दृढनिश्चयी आणि कधीकधी चुका करणाऱ्या असतात.

**दुसरा भाग (मध्य) :** कुटुंबाभिमुख स्वभाव. कौटुंबिक बंधांना महत्त्व देणारे आणि आपुलकीने वागणारे व्यक्तिमत्त्व.

**तिसरा भाग (तळ) :** समाजात लोकप्रियता आणि विरुद्ध लिंगाकडून आकर्षण. प्रेम आणि वैयक्तिक जीवनात चांगले भाग्य लाभते.

### तर्जनी

तर्जनीवरील तीळ स्पर्धात्मक स्वभाव आणि महत्त्वाकांक्षा दर्शवितात.

**पहिला भाग (टोक) :** कायद्याचे पालन करणारे किंवा कायद्याला आव्हान देणारे असे दोन टोकांचे स्वभाव. धाडसी आणि स्वतंत्र विचारांचे व्यक्तिमत्त्व.

**दुसरा भाग (मध्य) :** अतिशय स्पर्धात्मक आणि सर्व गोष्टींत पुढे जाण्याची इच्छा. काहीवेळा स्वतःचा अभिमान आणि इतरांशी स्पर्धा प्रबळ असते.

**तिसरा भाग (तळ) :** स्वार्थी प्रवृत्ती, विशेषतः प्रेमसंबंधांमध्ये. स्वतःच्या इच्छांना प्राधान्य देणारे व्यक्तिमत्त्व.

### मधले बोट

मधल्या बोटावरील तीळ व्यक्तीच्या स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाशी आणि जबाबदारीशी संबंधित आहे.

**पहिला भाग (टोक) :** कायद्याचे पालन करणारे आणि निष्ठावान नागरिक. मजबूत नैतिकमूल्ये असणारे व्यक्तिमत्त्व.

**दुसरा भाग (मध्य) :** जबाबदारीची जाण आणि परस्परसंबंधांना महत्त्व. सामाजिक आणि कौटुंबिक बांधिलकी जपणारे.

**तिसरा भाग (तळ) :** वास्तववादी दृष्टिकोन. विशेषतः भौतिक सुखांना प्राधान्य देणाऱ्या स्त्रियांमध्ये. व्यावहारिक आणि भौतिक जीवनावर लक्ष केंद्रित करणारे.

### अनामिका

अनामिका जोडीदार आणि



रोमँटिक जीवनाशी संबंधित आहे.

**पहिला भाग (टोक) :** कलात्मक प्रतिभा आणि सर्जनशीलता. कला आणि सौंदर्याची आवड असणारे व्यक्तिमत्त्व.

**दुसरा भाग (मध्य) :** प्रसिद्धी आणि वैभवाचा पाठलाग करणारे. सामाजिक मान्यता आणि यशाची महत्त्वाकांक्षा.

**तिसरा भाग (तळ) :** वासना आणि भावनिक प्रणय यांचे प्रतीक. तर्कापेक्षा भावनांना प्राधान्य देणारे आणि समजूतदार स्वभाव.

### करंगळी

करंगळी पुढील पिढी आणि संततीशी संबंधित आहे.

**पहिला भाग (टोक) :** कामगिरी आणि लक्ष वेधून घेण्याची क्षमता. इतरांचे लक्ष आणि प्रशंसा मिळविण्यात समाधान मिळते.

**दुसरा भाग (मध्य) :** मजबूत कार्यकारी आणि नियोजन कौशल्य. कार्यक्षम आणि योजनाबद्ध कार्य करणारे व्यक्तिमत्त्व.

**तिसरा भाग (तळ) :** संशोधन आणि विश्लेषणात्मक क्षमता. संशोधनकार्यात यशस्वी होण्याची शक्यता.

### तळहातावरील तीळ

**आख्यायिका :** तळहातावरील तीळ मागील जन्मातील प्रेमाचे वचन दर्शवितात. असे मानले जाते, की मागील जन्मातील प्रेमींनी पुढील जन्मात एकमेकांना शोधण्यासाठी तळहातावर तीळ ठेवले. जर एखाद्याच्या उजव्या तळहातावरील तीळ दुसऱ्याच्या डाव्या तळहातावरील तीळाशी जुळत असेल, तर ते मागील जन्मातील प्रेमी असल्याचे मानले जाते.

**स्वभाव :** तळहातावर तीळ असणारे लोक विचारशील, गणनाशील आणि अचूक असतात. ते अभियंते, न्यायाधीश किंवा लेखापाल यांसारख्या क्षेत्रांसाठी योग्य असतात. ते क्वचितच चुका करतात. मात्र कधी-कधी कमी रोमँटिक असू शकतात.

### हाताच्या मागील बाजूस तीळसुस्पष्ट तीळ

आर्थिक व्यवस्थापनात कुशलता आणि कौटुंबिक आर्थिक सामर्थ्याची जाण. मांसल हातावर सुस्पष्ट तीळ असल्यास व्यक्ती प्रतिभावान असते. नंतरच्या आयुष्यात जलद प्रगतीची शक्यता असते.

**अस्पष्ट तीळ :** कौटुंबिक विवाद आणि संघर्ष दर्शविते. अशी व्यक्ती चिंताग्रस्त असू शकते.

### मनगटावरील तीळआतील

**मनगट :** शहाणपण, विचारशीलता आणि अडचणींना धैर्याने सामोरे जाण्याची क्षमता. समस्यांचे निराकरण करण्यात कुशल.

**बाहेरील मनगट :** सावध, जबाबदार आणि वचन पाळणारे व्यक्तिमत्त्व. जोडीदार आणि कुटुंबाची काळजी घेणारे. लग्नाच्या शपथेला महत्त्व देणारे.

**रंग आणि अर्थ :** तेजस्वी तीळ

**(जीवंत) :** चातुर्य आणि हुशारी दर्शविते.

**मंद तीळ (मृत) :** कठोर परिश्रम आणि मेहनती स्वभाव दर्शविते.

**डावे मनगट :** करिअरसाठी शुभ.

**उजवे मनगट :** संतती आणि मुलांसाठी शुभ.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7011004040, 7011004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com

## प्लास्टिक बाटलीतून पाणी पिताय, सावधान!

पान १ वरून

की तेव्हा ते रोगप्रतिकारक शक्तीवर हल्ला करण्यास सुरुवात करते. यामुळे दीर्घकाळ जळजळ होऊ शकते. ज्यामुळे कालांतराने रक्तवाहिन्यांच्या अस्तरांना नुकसान होते. यामुळे डोळ्यातून पाणी येऊ शकते. हृदयात ब्लॉकेज निर्माण होऊ शकतात. धमन्या संकुचित होतात. रक्त प्रवाहात अडथळा निर्माण होतो. ठराविक कालावधीनंतर हृदयविकाराच्या झटक्याचाही धोका संभवतो. प्राण्यांवर केलेल्या अभ्यासात असे आढळून आले, आहे की शरीरात जमा झालेल्या मायक्रोप्लास्टिक्समुळे हृदयाच्या गतीत बदल होतो. यामुळे हृदयाच्या कार्यात अडथळा निर्माण होऊ शकतो. अलीकडील अभ्यासानुसार एक लिटर प्लास्टिकच्या बाटलीत सात प्रकारच्या प्लास्टिकचे सरासरी २ लाख ४० हजार कण असतात. अशाप्रकारे २० लिटर पाण्याच्या कॅनमध्ये किती असतील? याचा विचार करणे गरजेचे आहे.

**मायक्रोप्लास्टिक्स आपल्या शरीरात किती सहज प्रवेश करू शकतात?**

जेव्हा आपण क्लिंग फिल्ममध्ये गुंडाळलेली फळे आणि भाज्या खातो. प्लास्टिकच्या बाटलीतून पाणी पितो. तेव्हा आपण नकळतपणे अनेकदा मायक्रोप्लास्टिक्स गिळत असतो. मायक्रोप्लास्टिक्स शरीरात पोहचवण्याचा पाणी हा सर्वात सोपा वाहक आहे. कारण ते गिळल्यानंतर पोटात जाते. यावेळी प्रक्रियेत त्याचे आणखी तुकडे होतात. याशिवाय सरोवरे, नद्या आणि समुद्रातील मासे, विशेषतः शेलफिश प्लास्टिक खातात. यानंतर जेव्हा आपण हेच मासे शिजवून खातो तेव्हा नकळतपणे प्लास्टिक आपल्या शरीरात जाते. अशाप्रकारे नकळतपणे आपण चुकून रोज प्लास्टिक गिळतो.

**दूर कसे राहता येईल ?**

सध्याच्या काळात मायक्रोप्लास्टिक्स पूर्णपणे काढून टाकणे कठीण असू शकते. मात्र, इतर लोकसंख्येच्या तुलनेत गेल्या एक वर्षापासून हृदयविकाराचा धोका असलेल्या भारतीयांनी खाण्याच्या सवयीत काही बदल करणे आवश्यक आहे. नैसर्गिकरित्या पॅकेजिंग केलेल्या वस्तू निवडा. विश्वसनीय वॉटर फिल्टर वापरा. भाजीपाला थेट ऑफलाइन खरेदी करा. प्लास्टिकच्या वस्तूंपेक्षा काच, स्टील किंवा अगदी सिलिकॉनसारख्या वस्तूंचा वापर करा. प्लास्टिकच्या कंटेनरमध्ये अन्न मायक्रोवेव्ह करू नका.





# श्रीमती द्रौ. रा. कन्या शाळेत कायदेविषयक जनजागृती शिबिर

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर- येथील श्रीमती द्रौ. रा. कन्या शाळेत तालुका विधी सेवा समिती व वकील संघातर्फे शुक्रवार, दि. १४ नोव्हेंबर रोजी सकाळी कायदेविषयक जनजागृती शिबिर झाले. या शिबिरास विद्यार्थिनींचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

सह दिवाणी न्यायाधीश एन. आर. येलमाने यांनी विद्यार्थिनींना कलम १४, ३९ (अ) याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. केंद्र व राज्य विधी सेवा प्राधिकरणांतर्गत दिव्यांग, भूकंपग्रस्त, बालके, महिलांसाठी उपलब्ध असलेल्या मोफत विधी सेवेची माहिती दिली. पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम यांनी मुलींनी स्वतःचे संरक्षण कसे करावे, याबाबत प्रात्यक्षिकांसह मार्गदर्शन केले. विधी सेवा संघाचे ॲड. के. आर. बागुल यांनी मोबाईलचा योग्य वापर, सोशल मीडियावरील धोके, ऑनलाइन गेमिंग, व्यसनाधिनता आदींबाबत मार्गदर्शन केले. ॲड. आर. डी. कच्छवा यांनी मतदानाचा अधिकार, 'पोस्को' कायदा आणि 'गुड टच, बॅड टच' या महत्त्वाच्या विषयांवर विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. मुख्याध्यापिका एस. एस. सूर्यवंशी यांनी प्रास्ताविक केले. डी. एन. पालवे यांनी सूत्रसंचालन केले. एस. पी. वाघ यांनी आभार मानले. तालुका विधी सेवा समिती, वकील संघ, शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी यशस्वितेसाठी सहकार्य केले.

## मुलीस फूस लावून पळविले; एकावर गुन्हा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर- माळीवाडा परिसरातील एका अल्पवयीन मुलीस फुस लावून एका तरुणाने पळवून नेले आहे. ही घटना गुरुवार, दि. १२ नोव्हेंबर रोजी सायंकाळी चारच्या सुमारास घडली. मुलीच्या आईने दिलेल्या फिर्यादीवरुन त्यांची अल्पवयीन मुलगी ड्रॉइंग क्लासला जाऊन येते, असे सांगून घरुन निघाली होती. मात्र, ती रात्र होऊनही परतली नाही. तीला मोबाईलवर संपर्क साधला असता तो होऊ शकला नाही. त्यानंतर तीचा शोध घेतला असता ती आढळून आली नाही. याप्रकरणी अमळनेर पोलीस ठाण्यात अज्ञात तरुणाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



## तुम्हीच व्हा..! पत्रकार

अनेकांना पत्रकार होण्याची सुप्त इच्छा असते. मात्र त्यासाठी काय करावे ? आपल्याला ते जमेल का ? आपल्याला लिहिता येईल का? सर्वच वृत्तपत्रांनी पुरेशा संख्येत त्यांचे अधिकृत प्रतिनिधी नेमले आहेत मग आपल्याला कोण संधी देईल?

ती संधी आम्ही आपणास उपलब्ध करून देत आहोत. खास करून आपल्या भागातील किंवा अमळनेर विधानसभा मतदारसंघातील कोणतीही समस्या, निधन वार्ता , विवाह वार्ता शक्यतो फोटोसह आम्हास लिहून कळवा. आपल्याला जसे लिहिता येईल तसे लिहा. त्यास आम्ही बातमीचे स्वरूप देऊ. त्याखाली वाचक पत्रकार म्हणून आपले नावही प्रसिद्ध करू. आपले नाव गोपनीय ठेवावे अशी आपली इच्छा असल्यास आपले नाव प्रसिद्ध केले जाणार नाही. बातमी चांगली असल्यास आपल्या फोटोसह प्रसिद्ध करू. आपणास लिहिण्याची इच्छा नसल्यास काही विषयांवर आम्हीच लिहावे, त्यास व्यापक प्रसिद्धी द्यावी असे आपणास वाटत असल्यास आम्हास आपण आपल्या मतदारसंघातील विषय ही सुचवू शकता. चला तर मग होऊया आपण पत्रकार. फोडू या समस्यांना वाचा. देऊयात चांगल्या कार्यांना प्रसिद्धी.

**बातमीसाठी संपर्क :**
रजनीकांत पाटील : 8788441234
योगेश महाजन : 9850576058
भरत पाटील : 9922408434

**जाहिरातीसाठी संपर्क :**
शरद कुलकर्णी: 9922547800
रजनीकांत पाटील : 8788441234

# शिरुड जिल्हा परिषद शाळेच्या प्रांगणात गवताचे साम्राज्य!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : तालुक्यातील शिरूड येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या प्रांगणात गवत व काटेरी झाडेझुडपे मोठ्या प्रमाणात वाढली आहेत. ग्रामपंचायतीचे याकडे दूर्लक्ष आहे. गवत व ही काटेरी झुडपे काढावीत, अशी मागणी ग्रामस्थांसह पालकांमधून होत आहे.



(छायाचित्र : रजनीकांत पाटील)

शाळेच्या मैदानावर गुढग्यापर्यंत गवत वाढले आहे. यामुळे शाळेत येणाऱ्या विद्यार्थ्यांना त्रास सहन करावा लागतो. खेळण्यासाठी उभारलेली झोपाळे, विविध खेळण्याचे साहित्य, सायकल स्टँड मोडकळीस आले आहेत. काही साहित्यावर गवत वाढल्याने ते दिसेनासे झाले आहेत. अनेक विद्यार्थी हे सायंकाळी मैदानावर खेळण्यासाठी व व्यायामासाठी येतात. मात्र, सुविधा नसल्याने त्यांची नाराजी आहे. या गवतामुळे साप, विंचू आदींमुळे जिवितास धोकाही निर्माण झाला आहे. ग्रामपंचायत प्रशासनाने तत्काळे गवत काढून मोकळे करावे. मोडकळीस आलेले साहित्यही दुरुस्त करावीत, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

## मनस्वी आभार...!



माझ्या वाढदिवसानिमित्त शुक्रवारी (१४ नोव्हेंबर) आपण सर्वांनी प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष रूपाने विविध माध्यमांतून जो शुभेच्छारूपी वर्षाव केला, त्यासाठी मी मनापासून धन्यवाद देतो. आपले प्रेम, स्नेह आणि विश्वास यांचा अमूल्य ठेवा माझ्या मनाच्या गाभाऱ्यात कायम जतन राहील.

मनापासून धन्यवाद...!

**प्रा. शाम पवार**
माजी प्रेसिडेंट : शेतकी संघ, अमळनेर

## मनस्वी आभार...!

गुरुवार (ता. १३ नोव्हेंबर) रोजी माझ्या वाढदिवसानिमित्त माझे असंख्य मित्र नातेवाईक, समाजबांधव व हितचिंतकांनी मला वाढदिवसाच्या शुभेच्छा देवून त्यांचे माझ्यावरील भरभरून असलेले प्रेम प्रतित केले. माझ्या सर्व मित्र परिवाराने व समाजबांधवांनी समक्ष भेटून मला शुभेच्छा दिल्या. परमेश्वराकडे प्रार्थना केली. त्याबद्दल मी व माझा समस्त परिवार आपल्या सर्वांच्या ऋणात राहू इच्छितो.

भविष्यातही हेच प्रेम, आपलेपण व सहकार्य मला आपल्याकडून लाभावे,

ही नम्र विनंती!



**ॲड. श्री. आप्पासो. व्ही.आर. पाटील**
माजी जि. प.सदस्य,जळगाव.,
जिल्हा उपाध्यक्ष, भाजपा. (अमळनेर)

# अमळनेर नगरपरिषद, अमळनेर

| अ.क्र. | परवानगीचा तपशील | परवानगी देणारे अधिकारी / विभाग | परवानगीसाठी करावयाची पूर्तता |
|---|---|---|---|
| १. | चौक सभा व सर्व प्रकारच्या जाहीर सभा | पोलीस विभाग | ■ अर्ज ■ जागा मालकाचे संमतीपत्र ■ स्थानिक स्वराज्य संस्थेचा ना-हरकत दाखला |
| २. | पोस्टर्स/झेंडे सभेच्या ठिकाणी लावणे | संबंधित स्थानिक स्वराज्य संस्था | ■ अर्ज ■ खाजगी जागा असल्यास मालकाचे संमतीपत्र ■ स्थानिक स्वराज्य संस्थेचा ना-हरकत दाखला |
| ३. | खाजगी जागेवर जाहिरात फलक (कटआऊट वगळून) | संबंधित स्थानिक स्वराज्य संस्था | ■ अर्ज ■ खाजगी जागेच्या मालकाचे संमतीपत्र ■ फलक लावल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी यांना देणे आवश्यक आहे. |
| | **प्रचार वाहन परवानगी** | | |
| ४. | फक्त उमेदवाराच्या मतदारसंघाच्या कार्यक्षेत्रापर्यंत | निवडणूक निर्णय अधिकारी | ■ अर्ज ■ वाहन मालकाचे संमतीपत्र ■ वाहन नोंदणीपत्र ■ वाहनचालक परवाना |
| ५. | उमेदवाराचे तात्पुरते प्रचार कार्यालय | पोलीस विभाग व निवडणूक निर्णय अधिकारी | ■ अर्ज ■ जागा मालकाचे संमतीपत्र ३. स्थानिक स्वराज्य संस्थेचे ना-हरकत परवाना |
| ६. | हेलिपॅडवर हेलिकॉप्टर उतरविणे | संचालक, नागरी विमान सेवा | ■ अर्ज ■ जिल्हाधिकारी / पोलीस आयुक्त नाहरकत ■ स्थानिक स्वराज्य संस्थेचे आकारलेले शुल्क भरलेची पावती तसेच त्याचा दाखला ना-हरकत ■ P.W.D., Fire, Ambulance ची एनओसी |
| ७. | ध्वनिक्षेपकाची परवानगी | पोलीस विभाग | ■ अर्ज पोलीस ना-हरकत / परवानगी |

**निवडणुकीदरम्यान लागणारे विविध परवाने**

| अ.क्र. | परवानगीचा तपशील | परवानगी देणारे अधिकारी / विभाग | परवानगीसाठी करावयाची पूर्तता |
|---|---|---|---|
| ८. | मिरवणूक / रोड शो | पोलीस विभाग | ■ अर्ज ■ पोलीस ना-हरकत / परवानगी |
| ९. | प्रसार माध्यमांद्वारे देण्यात येणाऱ्या जाहीरातींच पूर्वप्रमाणन | प्रसार माध्यम संनियंत्रण समिती ■ राज्यस्तरीय समिती संपूर्ण राज्यात जाहीरात देणे ■ जिल्हास्तरीय समिती नगरपरिषद /नगरपंचायत तसेच ग्रामीण स्था.स्व.सं. ■ महानगरपालिकास्तरीय समिती महानगरपालिका निवडणुकांकरिता. | राज्य निवडणूक आयोगाच्या दि. ०९/१०/२०२५ रोजीच्या आदेशातील तरतुदीनुसार विहित नमुन्यात यथास्थिती राज्यस्तरीय / जिल्हास्तरीय / महानगरपालिका स्तरीय समितीकडे अर्ज करणे आवश्यक. |

ग्लोबल महातेज
आजच...! आपली जाहिरात बुक करा
दैनिक ग्लोबल महातेज उपलब्ध करून देत आहे आपणास
'चमकण्याची' तसेच आपली व्यक्तिगत, राजकीय, व्यावसायिक प्रसिद्धी जाहिरात रूपाने प्रचंड मोठ्या प्रमाणावर करण्याची सुवर्णसंधी...!





रोज साडेतीन हजार पेपरचा खप असलेले ब्रॉडशिट आकारातील चारही पाने रंगीत असलेले
महाराष्ट्रातील एकमेव वृत्तपत्र ...!!
डिजिटल पेपरच्या सहाय्याने लाखो लोकांपर्यंत पोहोचणारा अफलातून पेपर...!!!

**जाहिरात दर**

| | | |
|---|---|---|
| १) | पूर्ण पान | 45,000/- रु. |
| २) | अर्ध पान | 25,000/- रु. |
| ३) | पाव पान (16 x 25 सें. मी.) | 13,000/- रु. |
| ४) | 16 x 13 सें. मी. | 7,000/- रु. |
| ५) | 12 x 10 सें. मी. | 4,000/- रु. |
| ६) | 8 x 10 सें. मी. | 2,500/- रु. |
| ६) | ३ वर्षांखालील बाळाचा वाढदिवस | 200/- रु. |
| ७) | शुभविवाह जाहिरात ( वधू-वराच्या रंगीत फोटोसह ) | 300/- रु. |
| ८) | लिगल नोटीस | 150/- रु. |
| ९) | उठावणा जाहिरात | मोफत |

* फ्रंट पेज साठी जाहिरात २०% जादा दर असेल. * शेवटच्या पानासाठी १०% जादा दर असेल.

जाहिरात बुकिंगसाठी संपर्क
शरद कुलकर्णी : 99225 47800/95271 08678
रजनीकांत पाटील : 87884 41234
वरील सर्व दरांत नियमित जाहिरातदारांना विशेष सवलत मिळेल व बातम्यांच्या स्वरूपात मोठी प्रसिद्धी मिळेल.




# जळकंठेश्वर : एक मौल्यवान ठेवा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

एखाद्या रूपवतीचे सौंदर्यच कधी-कधी तिचा घात करते म्हणतात. तशीच काहीशी गोष्ट एका दुर्दैवी मंदिराबाबत घडली. जळकंठेश्वर- तमिळनाडूच्या बाहेर फारसे परिचित नसलेले एक मंदिर. वेल्लोरच्या बलाढ्य किल्ल्यात ताठ मानेने गेली साडे चारशे वर्षे उभे असलेले. या नितांत सुंदर मंदिराने जितकी स्थित्यंतरे पाहिली तितकी तो कालपुरुष सोडून क्वचितच कोणी पहिली असतील.

विजयनगर काळात या मंदिराचा मोठा मान होता. वेल्लोरचा किल्ला विजापूर सुलतानांच्या घशात गेल्यावर अर्थातच तेथील पूजा-अर्चा बंद पडली. काहींच्या मते तर मंदिराचा एक भाग मशीद म्हणून वापरण्यात आला. मग आले झुंजार मराठे. छत्रपती शिवरायांच्या दक्षिण दिग्विजय मोहिमेत वेल्लोरचा किल्ला मराठ्यांच्या ताब्यात आला. गडपती शिवरायांनी किल्ल्याची मजबुती अजूनच वाढविली. मंदिराचे थोडेसे ‘ अच्छे दिन ’ येतात तोच किल्ला मुघल सुलतानांच्या कडे (दाऊद



खान) व नंतर ब्रिटिशांकडे गेला आणि हे सुंदर मंदिर परत अंधारात बुडाले.

या मंदिराचा एक मंडप इतका सुंदर, की ईस्ट इंडिया कंपनीचा एक गव्हर्नर त्याच्या अद्भुत सौंदर्याने संमोहित झाला. त्याने ती अक्खी इमारतच सुटी करून लंडनला न्यायची ठरविली. सायबाचे काम म्हणजे टोटल पद्धतशीर. प्रत्येक खांब, प्रत्येक मूर्तीला नंबर दिले गेले आणि लंडनमध्ये असे जड आणि मौल्यवान सामान आणण्यासाठी ‘ पेशल ’ जहाज बनवले गेले आणि ते वेळेवर तेथून निघालेही. वरुण देवाच्या कृपेने ते जहाज बुडाले. भारताचा हा मौल्यवान ठेवा केवळ नशिबानेच भारताकडे राहिला. परंतु मंदिराचा विजनवास येथेच थांबला नाही. झाले असे की मद्रास आर्मीच्या कमांडरने हिंदू सैनिकांना कपाळावर गंध लावण्यास प्रतिबंध केला. मुस्लीम सैनिकांना दाढी-मिशा नीट आकारात ठेवायचा फतवा काढला. सैनिकांच्या पागोट्याची जागा इसाई लोकांसारख्या टोपीने घेतली. या सर्वांचा एक असंतोष किल्ल्यामधील सैन्यात उफाळून आला. टिपू सुलतानची दोन मुले आणि काही मुली या किल्ल्यात कैदेत होती. टिपूच्या एका मुलीच्या लग्नाचे निमित्त करून बंडवाल्यांनी १० जुलै १८०६ मध्ये किल्ला ताब्यात घेतला. पण काही दिवसांतच ब्रिटिशांनी हे बंड अगदी क्रूरपणे चिरडले. वेल्लोर म्युटिनीनंतर ब्रिटिश सावध झाले आणि वेल्लोरच्या किल्ल्याचे रूपांतर ज्यादा शिबंदी असलेल्या मजबूत लष्करी छावणीमध्ये करण्यात आले. त्याच भानगडीत त्यांनी मंदिराचा कल्याण मंडप चक्क एका बॅरेकमध्ये बदलून टाकला. जेथे वेदांच्या ऋचा घुमल्या, मंत्रांचे जयघोष घुमले, जेथे अनेक मंगल कार्ये घडली, जेथे विजयनगरचे पराक्रमी नायक नतमस्तक झाले तीच इमारत आता गोऱ्या साहेबाचे विश्रांती स्थळ झाली. स्वातंत्र्यानंतर आता या राऊळास परत बरे दिवस आले आहेत. पर्यटक व भाविकांचा वाढता राबता यांनी आता मंदिर गजबजलेले असते. परकीयांनी आक्रमण करून आपले केवळ आर्थिक शोषणच नव्हे, तर धार्मिक आणि सांस्कृतिक शोषणही केले. त्याचे जीवंत उदाहरण म्हणजे हे नितांत सुंदर मंदिर. आपल्या पूर्वजांनी सर्व प्रतिकूलतेविरोधात आपल्या परंपरा जपल्या आणि अशा सांस्कृतिक विध्वंसाविरोधात लढा दिला. त्याचा पुरावा म्हणजे हे पुरातन मंदिर.

# सात मुख्य प्रश्न

१) सर्वांत दुर्लभ देह कोणता?
२) सर्वांत मोठे दुःख कोणते?
३) सर्वांत मोठे सुख कोणते?
४) संत व दुर्जन यांची लक्षणे कोणती?
५) सर्वांत मोठे पुण्य कोणते ?
६) सर्वांत मोठे पाप कोणते ?
७) मानसरोग कोणते व ते कसे ओळखावेत?

१) पहिला प्रश्न आहे त्याचे उत्तर असे, की मानवदेहासारखे श्रेष्ठ दुसरे शरीर नाही. कारण याच देहामध्ये स्वर्ग, नरक किंवा मोक्ष प्राप्त करता येऊ शकतो. असे शरीर मिळूनदेखील जे हरिभजन करीत नसतात. ते महामूर्ख समजा.

२) दारिद्र्यासारखे मोठे दुःख दुसरे कोणतेही नाही.

३) संतांची भेट होणे हे सर्वांत श्रेष्ठ सुख होय. संत हे परमदयाळू असतात.

४) परहितासाठी स्वतः दुःख भोगणारे ते संत समजा. तसेच दुसऱ्याला दुःख देण्यासाठी जे वेळप्रसंगी स्वतःच्या अंगाची सालसुद्धा सोलायला कमी करीत नाहीत, ते दुर्जन. विनाकारण लोकांना दुःखच देणे हाच त्यांचा स्वभाव होय.

५) परहितासारखे दुसरे मोठे पुण्य नाही. अहिंसा हाच परम धर्म

६) परनिंदे एवढे पाप नाही. शिवनिंदक व गुरुनिंदक बेडकाच्या जन्मात जातो तर ब्राह्मणद्वेष्ट्याच्या नशिबात नरकवास व नंतर कावळ्याचा जन्म. जो शास्त्र व देवता यांची निंदा करतो तो रौरव नरकाचा धनी. संतांचा जो द्वेष करील तो घुबडाच्या जन्माला जाईल. सर्वांचीच जो निंदा करील तो वटवाघूळ होईल.

७) सातव्या प्रश्नाचे उत्तर ऐका. सर्व रोगांचे मूळ कारण आहे अज्ञान. काम हा वातरोग आहे तर लोभ हा कफ आहे. राग (संताप) हा पित्त आहे जो छातीत जळजळ निर्माण करतो. जर कधी हे तिन्ही उफाळले तर त्यापासून सन्निपात नावाचा रोग होतो. दुर्मिळ अशा विषयांची दुर्दम्य कामना हे शूलरोग. त्यांची नावे असंख्य आहेत. ममता ही गजकर्ण तर ईर्षा ही खाज, आनंद व निराशा हे घशाचे विकार (घटसर्प, गंडमाळा वगैरे) तर दुसऱ्याचे सुख पाहून जळणे हा क्षयरोग आहे.

अहंकार हा गाठीचा रोग आहे. ढोंग, कपट, रगेलपणा आणि गर्व हा नारू. हावरेपणा हा जलोदर तर पुत्रेषणा, वित्तेषणा व लोकेषणा व दारेषणा हा एक दिवसाआड येणारा ताप आहे. मत्सर आणि अविवेकीपणा हे दोन वेगळ्या तऱ्हेचे ज्वर आहेत. अशा प्रकारचे अनेक दुर्धर रोग आहेत. त्यांची मोजदाद कुठवर करणार? यातला एखादा जरी झाला तरी जीव मरणोन्मुख होतो, तर अशा अवस्थेत त्याला शांती कुठली?

तसे पाहिले तर नेम, धर्म, सदाचार, तप, जप, दान असे उपायसुद्धा अनेक आहेत. पण त्यामुळे हे रोग समूळ जात नसतात. जगात रोगी तर सर्वच असतात. मी हे मोजकेच रोग तुम्हाला सांगितले. हे रोग जर कुणी ओळखले तर ते रोग सौम्य होतात पण नाश पावत नाहीत. विषयांचे कुपथ्य झाले तर ते मुनींनाही सोडीत नाहीत. मग सामान्य माणसाचा यांच्या समोर काय पाड लागणार? पण (निराश होण्याचे कारण नाही) जर प्रभू श्रीरामचंद्र यांच्या कृपेने सत्संग मिळाला तरच हे रोग नष्ट होतील. सद्गुरूरूप वैद्यावर विश्वास ठेवावा. श्रीरघुनाथाची भक्ती हीच संजीवनी आहे. श्रद्धावान बुद्धी हेच अनुपान होय. मन (रामभजनाने) निरोगी झाले की कामच झाले समजा. प्रभू श्रीरामचंद्रांच्या भजनाविना सुख नाही, हा सर्वमान्य सिद्धांतच आहे.

# परशुराम कुंड : ऋषी परशुरामांना समर्पित स्थळ

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

परशुराम कुंड हे भारतातील अरुणाचल प्रदेशातील लोहित जिल्ह्यातील हिंदू तीर्थस्थळ आहे. हे ब्रह्मपुत्र पठारावर लोहित नदीखालच्या भागात आणि अरुणाचल प्रदेशातील लोहित जिल्ह्यातील तेझूपासून सुमारे ४८ कि.मी. अंतरावर वसलेले आहे.

ऋषी परशुरामांना समर्पित हे लोकप्रिय स्थळ नेपाळमधील जवळच्या मणिपूर आणि आसाम राज्यांसह संपूर्ण भारतातील यात्रेकरूंना आकर्षित करते. दरवर्षी जानेवारीत मकर संक्रांतीच्या निमित्ताने ७० हजारांहून अधिक भाविक आणि साधू त्याच्या पाण्यात पवित्र स्नान करतात.



## परशुराम कुंड

या कुंडाची स्थापना मूळतः १९७० च्या दशकात आसामहून येणाऱ्या यात्रेकरूंनी केली होती. त्याला पर्यटनस्थळ म्हणून प्रोत्साहन देण्यात आले होते. हे मंदिर भगवान परशुरामांना समर्पित आहे. तसेच देवी रेणुकेला समर्पित एक मंदिर देखील आहे.

भगवान परशुराम हे श्री महाविष्णूचे सहावे अवतार आहेत. येथे श्री महाविष्णूंना समर्पित एक दशावतार मंदिर आहे. ज्यामध्ये भगवान विष्णूंचे सर्व दहा विशिष्ट अवतार आहेत.

## धार्मिक महत्त्व

लोहित नदीखालच्या भागात वसलेले हे अखिल भारतीय महत्त्वाचे मंदिर आहे. दरवर्षी हिवाळ्यात, विशेषतः मकर संक्रांतीच्या दिवशी हजारो यात्रेकरू या ठिकाणी येतात आणि पवित्र कुंडात स्नान करतात, असे मानले जाते. स्थानिक लोक सांगतात, की या सुंदर ठिकाणामागे पौराणिक कथा आहे.

असे मानले जाते, की भगवान विष्णूंचा सहावा अवतार असलेल्या परशुरामाने त्यांचे वडील ऋषी जमदग्नी यांच्या आदेशानुसार आपल्या आई रेणुकेचा शिरच्छेद केला. आईची हत्या करण्याचा सर्वांत वाईट गुन्हा त्याने केल्यामुळे कुऱ्हाड त्याच्या हातात अडकली. त्याच्या आज्ञाधारकतेवर खूश होऊन त्याच्या वडिलांनी त्याला वरदान देण्याचा निर्णय घेतला. ज्यावर त्याने त्याच्या आईला पुन्हा जिवंत करण्याची विनंती केली. त्याच्या आईला पुन्हा जीवंत केल्यानंतरही त्याच्या हातातून कुऱ्हाड काढता आली नाही. हे त्याने केलेल्या भयंकर गुन्ह्याची आठवण करून देणारे होते. त्याला त्याच्या गुन्ह्याबद्दल पश्चात्ताप झाला आणि त्या काळातील प्रख्यात ऋषींचा सल्ला घेत तो लोहित नदीकाठावर त्याच्या शुद्ध पाण्यात हात धुण्यासाठी पोहोचला. तो त्याला सर्व पापांपासून शुद्ध करण्याचा एक मार्ग होता. त्याने पाण्यात हात बुडवताच कुऱ्हाड लगेचच वेगळी झाली. तेव्हापासून त्याने हात धुतलेले ठिकाण पूजास्थळ बनले आणि ते परशुराम कुंड म्हणून ओळखले जाऊ लागले. तसेच भारतातील वेगवेगळ्या प्रदेशांत अशा अनेक कथा आहेत. ज्या वरील घटनेचे वर्णन करतात. परशुरामांना समर्पित असंख्य मंदिरे आहेत. ज्यापैकी बहुतेक केरळमध्ये आहेत. परंतु हे ठिकाण जवळून आणि दूरवरून अनेक यात्रेकरूंना आकर्षित करते. येथे बरेच संन्यासी राहतात आणि परशुरामांना समर्पित मंदिराची देखभाल करतात.

## इतिहास

साधूंनी स्थापन केलेले परशुराम कुंडाचे स्थळ १९५० च्या आसाम भूकंपापर्यंत अस्तित्वात होते. ज्याने संपूर्ण ईशान्येला हादरवून टाकले. कुंड पूर्णपणे झाकले गेले. आता कुंडाच्या मूळ जागेवरून एक अतिशय तीव्र प्रवाह वाहत आहे. परंतु मोठे दगड एका रहस्यमय पद्धतीने नदीपात्रात एका वर्तुळाकार रचनेत गुंतले आहेत.

त्यामुळे जुन्या कुंडाच्या जागी दुसरा कुंड तयार झाला आहे. मालिनी (पार्वती) चे घर असल्याचे मानले जाणारे मंदिर लिकबली उपविभागातील घागरा आणि घई नद्यांच्या खडकाळ टेकड्यांवर आहे.

## पर्यटन

येथे मकर संक्रांतीवेळी दरवर्षी मेळा भरतो. ज्यामध्ये डोंगराळ आदिवासी जंगली गायी, दुर्मिळ फर-रग आणि इतर कुतूहल आणतात. तेझू ते ग्लो लेकपर्यंत ट्रेकिंगसाठी एक दिवस, हायकिंग आणि लोहित नदीवर रिव्हर राफ्टिंग आणि मासेमारीसाठी सुविधा देखील आहेत.

# कामधेनू



हिंदू पुराणकथांत सर्व इच्छा पूर्ण करणारी धेनू म्हणून कामधेनूचा उल्लेख आहे.कामधेनू म्हणजे हिंदू धर्मातील एक दिव्य गाय आहे, जिची सर्व इच्छा पुर्ण करण्याची क्षमता आहे असे मानले जाते. ती सर्व गोवंशाची माता मानली जाते. संपत्ती व समृध्दीचे ती प्रतीक आहे. देवासुरांनी समुद्रमंथन केले तेव्हा त्यातून वर आलेल्या चौदा रत्नांतील कामधेनू ही एक होय. दुसऱ्या एका कथेत दक्षकन्या सुरभी आणि कश्यप प्रजापती यांच्या रोहिणी नावाच्या मुलीस शुन:शेपापासून (अथवा शूरसेनापासून) कामधेनू झाली, असा उल्लेख आहे. नंदिनी असेही तिचे नाव आहे. शंकराचे वाहन असलेला नंदी कामधेनूस वेताळापासून झालेला पुत्र होय.

कामधेनू रंगाने पांढरी असून चार वेद तिचे पाय व चार पुरुषार्थ तिचे स्तन आहेत. शबला नावाची एक कामधेनू वसिष्ठाकडे होती. कालिदासाने रघुवंशात तिचा उल्लेख ‘ नंदिनी ’ असा केला आहे. सुवर्णाची कामधेनू दान करणे हे एक महादान असून, त्यामुळे सर्व पापांचा नाश होतो व स्वर्गप्राप्ती होते. कामधेनूव्रत नावाचे एक व्रतही आहे.

# सोन्याची जेजुरी..!



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

जेजुरीपासून १५ किलोमीटरवर अष्टविनायकातील प्रमुख मोरगाव आहे. मोरया गोसावी यांना कऱ्हा नदीत ‘ तांदळा गणपती ’ मिळाला. तो घेऊन ते पुढे चिंचवडला आले. तेथून दरवर्षी भाद्रपदात व माघात ते मोरगावला जात. तांदळा गणपती भाद्रपदात पालखीतून व माघात घोड्यावरून ते नेत असत. याला ‘ भादवी ’ व ‘ माघी ’ यात्रा म्हणतात. या वारीवेळी जेजुरीला श्रींचा मुक्काम होतो. त्यांची पालखी गडावर येते. मंदिरात त्यांची व मार्तंड भैरवाची भेट होते. दोघांवरही भंडारा उधळला जातो. ‘ मंगलमूर्ती मोरया- खंडेरायाचा येळकोट ’ म्हणत यात्रेकरू एक दिवस गडाच्या पायथ्याशी मुक्काम करून मार्गस्थ होतात. साहजिकच या दोन्ही दिवशी जेजुरीला अक्षरशः यात्रेचे स्वरूप असते.

अशी ही जेजुरी..! येथे सतत यात्रा, उत्सव मोठ्या प्रमाणावर साजरे होतात. लाखो भाविक येथे येतात. ‘ येळकोट येळकोट मल्हार’ असा जयजयकार करतात. एका ताम्हनात पाने, सुपारी, भंडारा, आणि खोबरे ठेवून ते येळकोट मल्हार म्हणत देवापुढे तीन वेळा उचलतात आणि नंतर दिवटी-बुधलीने आरती करतात. भंडारा व खोबरे उधळतात. या धार्मिक विधीला ‘ तळी भरणे ’ असे म्हणतात. मंदिरात जाताना तळी भरण्यासाठी खास देवडी आहे.

लग्न झाल्यावर नवदाम्पत्याने जेजुरीला येऊन तशी तळी भरण्याची प्रथा काही घराण्यात आहे. त्याला ‘ आहेर यात्रा ’ असे म्हणतात. येणारे सर्व भाविक भंडारा उधळून ‘ देवा खंडेराया, आमच्या आयुष्याचे सोने कर, देशात धनधान्य भरपूर पिकूदे, वीरवृत्ती वाढूदे ’ असा मनापासून आशीर्वाद मागतात.

अशा वेळी हर्षभराने ते उधळत असलेल्या भंडाऱ्याचे लक्षावधी कण हवेत पसरतात आणि जेजुरीत सर्वत्र सुवर्णाची पखरण होते. मग भक्त म्हणू लागतात, की देवा तुझी सोन्याची जेजुरी..! सोन्याची जेजुरी..!


